डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)
कुलसचिव
सूचना का अधिकार
दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२

## परिपत्रक

क्र. साप्रवि/जनरल/पासेस/२६२५/२०२३ दिनांक : २१/१२/२०२३

**प्रस्तावना :** विद्यापीठामध्ये विशेषत: अकोला मुख्यालय येथे विविध प्रकारचे कार्यक्रमाचे कृषि प्रदर्शनी, शिवार फेरी, दिक्षांत समारंभ व इतर कार्यक्रमास विविध **झेड प्लस सुरक्षा असलेले मान्यवर** मा. राज्यपाल महोदय, मा. मुख्यमंत्री महोदय, मा. केंद्रीय मंत्री महोदय, मा. उपमुख्यमंत्री महोदय तसेच मा कृषि मंत्री महोदय उपस्थित राहतात. अशा आयोजीत कार्यक्रमास आवश्यकतेनुसार पोलीस पासेसची गरज असते. सदर पासेस पोलीस अधिक्षक कार्यालयाकडुन प्राप्त करुन विद्यापीठातील संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना वितरीत करण्याकरीता कुलसचिव कार्यालयाला विविध प्रकारच्या अडचणी येत आहे. त्यामुळे याविषयी दक्षता घेण्याकरीता परिपत्रक निर्गमित करणे आवश्यक आहे.

१) या परिपत्रकाव्दारे विद्यापीठामध्ये आयोजित असणाऱ्या विविध कार्यक्रमाशी संबंधित संचालक, कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, यापुढे ज्यांना पासेसची आवश्यकता आहे त्या अधिकारी/ कर्मचारी यांनी ०.७५ इंच x १ इंच उभा साईजचे अद्यावत काढलेले रंगीत फोटो तसेच फोटोमागे संबंधितांचे नाव व पदनाम (मार्कर पेनने) लिहणे आवश्यक आहे. जुने फोटो ग्राहय धरल्या जाणार नाही.

२) पासेसची मागणी करतांना नावे दोन फोटोसह यादी पाठविणे आवश्यक आहे. सदर यादी उपकुलसचिव (सामान्य प्रशासन), डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांचेकडे सादर करावे. पासेसकरीता विना फोटो किंवा १ फोटो ग्राहय धरल्या जाणार नाही, असे पासेस वितरीत केल्या जाणार नाही.

३) जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडून तयार झालेले पासेस कुलसचिव कार्यालयाकडून घेऊन जाणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नाव, पदनाम व मोबाईल नंबर यादीमध्ये नमुद करावे. गैरसोय टाळण्याकरीता १ अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव प्रस्तावित करावे. नमुद अधिकारी / कर्मचारी यांचे व्यतिरीक्त कोणालाही पासेस वितरीत केल्या जाणार नाही.

४) विविध कार्यक्रमाकरीता विविध समित्या गठीत करण्यात येतात त्या समितीचे सचिव यांनी ज्यांना पासेसची आवश्यकता आहे, अशीच मर्यादीत यादी सादर करणे आवश्यक आहे. पोलीस अधिक्षक कार्यालयातर्फे सर्वाना सर्व ठिकाणची पासेस निर्गमित केल्या जात नाही. त्यामुळे विशिष्ट ठिकाणाचा पासेस करीता उल्लेख करावा.

५) विशेषत: डायस कमिटी यांनी मंचावरील मान्यवर, अतिथी सोबत असणारे सुरक्षारक्षक, खाजगी सचिव व इतर संबंधित अधिकारी तसेच स्वागत साहित्याकरीता लागणारे व्यक्ति इत्यादीचा विचार करुन डायस आराखडा (बैठक व्यवस्था) तयार करणे व डीई अंतर यास निवासी जिल्हाधिकारी यांची मान्यता घेणे. तसेच मंच व्यक्ति क्षमता याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून मान्यता प्रमाणपत्र विद्यापीठ अभियंता कार्यालयाने प्राप्त करुन घेणे व या कार्यालयास सादर करणे. जेणेकरुन पोलीस अधिक्षक कार्यालयास ही अत्यावश्यक माहिती पुरविणे सुलभ होईल.

६) या कार्यालयातर्फे विद्यापीठातील अधिकारी/ कर्मचारी यांचे पासेस बनविणे व वितरीत करणे ही कार्यवाही करण्यात येईल. खाजगी कंपनी/ कंत्राटदार/ खानसामा/ विद्युतवाले/ मंडपवाले इत्यादी व्यक्तींची पासेस वितरीत केल्या जाणार नाही.

७) जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयाकडुन मर्यादित पासेस वितरीत केल्या जातात. ज्या व्यक्तीचा किंवा ठिकाणाचा संबंध **झेड प्लस** च्या मार्गामध्ये नाही त्यांची पासेस नाकारल्या जाते, त्यामुळे आवश्यक व मर्यादित व्यक्तींची पासेस मागणी करावी.

वरील परिपत्रक विद्यापीठामध्ये आयोजीत कार्यक्रम सुरळीत पार पाडण्याकरीता निर्गमित करण्यात येत आहे.
कृपया सर्वांनी नमुद सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, याची कृपया नोंद घ्यावी.
मा. कुलगुरु महोदय यांचे मंजुरीने निर्गमित.

(सुधीर राठोड)
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

Scanned with OKEN Scanner

**प्रतिलीपी** :

१) संचालक (सर्व) ------------------------------------------------------------------------------

२) अधिष्ठाता (सर्व) ----------------------------------------------------------------------------

३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ----------------------------------------------------------------------

४) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) -------------------------------------------------------------------

५) कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र (सर्व) ---------------------------------------------------------

७) प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय (सर्व) ----------------------------------------------------------------

८) प्रभारी अधिकारी (सर्व) ------------------------------------------------------------------------

९) प्रभारी अधिकारी (ARIS Cell), यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

१०) विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) ---------------------------------------------

११) विद्यापीठ नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

१२) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

१३) सहाय्यक कुलसचिव (आस्थापना/साप्रवि/परिक्षा/समिती/प.शि.सं./कृ.म.वि./उ.वि.म./व.वि.म./कृषि अभि.) ---------

१४) सहाय्यक नियंत्रक (अंदाजपत्रक/मुख्यालय)/ अधिदान व लेखाधिकारी (अकोला/ नागपूर)

१५) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक/ तांत्रिक सचिव/ विशेष कार्यकारी अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

१६) मा. कुलसचिवांचे स्वीय सहायक यांना माहितीकरीता सादर.

१७) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

१८) ----------------------------------------------------------------------------------------------

Scanned with OKEN Scanner